# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/12/2022 (बुधवार) सकाळ

---

## जिवानाशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी अंतरावर मौजा शिवनी मृतकाचे राहते घरी, तह. कामठी, जि. नागपुर येथे दिनांक ०१/१२/२०२२ चे २२.०० ते दिनांक ०२/१२/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे– नामदेव कवडू वाघ यांची बहीण फिर्यादी नामे– शिला जयदेवजी कुथे, वय ३८ वर्ष, रा. गादा नेरी, ता. कामठी हिने तक्रार दिली की, मृतकाची पत्नी आरोपी नामे– विदया नामदेव वाघ, वय २८ वर्ष, रा. शिवनी, ता. कामठी हिचे त्याच गावात राहणारा किरण गोविंदरावजी आकरे यांच्या सोबत प्रेम संबंध असल्याने आरोपी पत्नी हीने आपले पती मृतक यांचे नावावर असलेली शेती आपल्या नावावर करून मागितले असता नावावर करून देण्यास मनाई केली याच कारणावरून त्यांचा नेहमी वाद होत असल्याने पतीचा काटा काढण्याच्या उदेदशाने यातील आरोपी पत्नी हिने मृतकाचा रस्सीने गळा आवरून जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक हेमंतकुमार खराबे पोलीस स्टेशन मौदा मो. क्र. ९९२३४३८३५५ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा बडेगाव येथे दिनांक ०५/१२/२०२२ चे २३.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे– अनिल दमडू खंडाते, वय २६ वर्ष, रा हिंगणा (खुबाळा ) ता. सावनेर याचा मोठा भाऊ जखमी नामे– गोविंदा खंडाते हा गावातील बारस्याच्या कार्यक्रमात जेवण वाढीत असतांना यातील आरोपी नामे– सुनिल दमडू खंडाते, वय २५ वर्ष, रा. हिंगणा (खुबाळा) सावनेर याने लग्नात येवुन त्यास म्हणू लागला की, ‘‘इतक्या रात्री तू काय करते तू घरी जा’’ असे म्हणून शिवीगाळ करून प्लास्टीकच्या खुर्चीने डोक्यावर मारून जखमी केले व हातबुक्क्याने मारपीट करून मारण्याची धमकी दिली. जखमी याला मेडीकल कॉलेज, नागपूर येथे परस्पर उपचारा करीता घेवून गेले व जखमीला फिर्यादी हा पोलीस स्टेशनला घेवून आल्याने व जखमी हा मुका असल्याने फिर्यादीच्या तोंडी रीपोर्ट व डॉ. अहवाल वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राठोड ब. नं. ५२ पोलीस स्टेशन खापा मो. नं. ९९२२४२००५२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर